अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.

# थिऑसोफीचा अितिहास–३

या पुस्तकांतले दोन कागद विशेष महत्वाचे आहेत. अेक 'माझा कबुलीजबाब' या मथळ्याचें तिने सॉलॉव्हिऑफ याला लिहिलेलें पत्र किंवा लेख. त्यांत तिने १८४८ नंतरचें आपलें आयुष्य कसें लुच्चेगिरीनें भरलेलें आहे हें दाखवणारें अेक पुस्तक लिहिण्याचा आपला मानस त्याला कळवला आहे. सायकिकल सोसायटीने तिची लुच्चेगिरी नुकतीच सिद्ध केली होती, तेव्हां त्यांतूनही पैसे काढण्याचा अेक चांगला मार्ग म्हणजे या फसवेगिरीची अितथंभूत हकीकत स्वतःच लिहून प्रसिद्ध करणें. परंतु नंतर तिला असें आढळलें कीं आपल्या लुच्चेगिरीबद्दल थिऑसॉफिस्टांची मुळीच खात्री झालेली नाही. तेव्हां तिने हा कबुलीजबाब केव्हांही लिहिला नाहीं. पण तिने सॉलॉव्हिऑफजवळ आपली कबुली दिली होती आणि ही कबुली खरी होती असें तिचा पक्ष घेणाऱ्या तिच्या बहिणीनें देखील स्पष्ट सांगितलें आहे. तेव्हां तिच्या फसवेगिरीबद्दल आतां शंका राहिलेली नाही.

दुसरा महत्वाचा कागद म्हणजे तिने आक्साकॉफला १८७४ सालीं लिहिलेलें पत्र. अँड्र्यू जॅकसन डेव्हिड नांवाच्या तिच्या अेका सहधर्मी स्नेह्याला आक्साकॉफने फ्रेंच भाषेत अेक पत्र लिहिलें होतें, व त्याला ती भाषा येत नसल्यामुळे त्याने तें तिच्याकडे भाषांतर करण्याकरतां आणलें होतें. त्यांत त्यानें तिच्या स्वतःसंबंधी असें लिहिलें होतें की 'मॅडम ब्लॅव्हॅट्स्कीच्या अेका नातलगाने ती अत्यंत प्रभावी मध्यस्थ असल्याचें मला सांगितलें आहे, पण तिच्या

पत्रांवरून तिला नीतीची फारशी चाड दिसत नाही.' यावर तिने आक्साकॉफला पत्र लिहिलें की 'वीस वर्षांपूर्वी मी नास्तिक असल्यामुळे मला नैतिक मार्गदर्शक कोणी नव्हता आणि यामुळे मी अत्यंत वाईट चालीची होतें, पण आतां मी अध्यात्मवादी झाल्यामुळे हल्ली माझें जीवन पवित्र आहे.' अर्थात् आक्साकॉफ हा अध्यात्मवादी असल्यामुळे त्याच्यावर याचा परिणाम झाला.

१८७४ सालीं तिची वर्तणूक सुधारली होती असें धरून चाललें (हें धरून चालण्याला कांही आधार नाही) तरी पण तिच्या पत्रावरूनच ती पूर्वी वाईट चालीची होती हें सिद्ध होतें, तेव्हां थोड्याच वर्षांपूर्वी मिसेस बेझंट यांनी 'अेनसायक्लोपीडिआ ऑफ रिलिजन अँड अेथिक्स' या कोशांत 'थिऑसॉफिकल सोसायटी' या मथळ्याखाली तिचें जें वर्णन दिलें आहे तें वाचून मनुष्य थक्क होतो. त्या म्हणतात, 'मॅडम ब्लॅव्हॅट्स्की ही अेका बड्या रशियन घराण्यांतली बाअी होती. तिची आध्यामिक शक्ति जबरदस्त होती आणि तिच्या पौर्वात्य गुरूने या शक्तीची शक्य तितकी वाढ केली होती. त्याला तिबेटांत जाऊन भेटण्याकरतां तिने आपला उच्च दर्जा, पैसा, कुटुंब (म्हणजे सोळाव्या वर्षी ज्याच्याशीं तिचें लग्न झालें तो ७० वर्षांचा नवरा) वगैरे सर्व सोडून त्याच्याजवळ कांही वर्षे काढलीं, आणि त्यांनीं सांगितलेलें कार्य करण्यांत तिने आपलें सर्व राहिलेलें आयुष्य वेंचलें.'

या वर्णनांतला प्रत्येक शब्द खोटा आहे आणि मिसेस बेझंट यांनी हें जणूं काय सर्वमान्य मत म्हणून दिलें आहे. परंतु मॅडम ब्लॅव्हॅटस्कीच्या स्वतःच्या पत्रावरूनच हें सर्व खोटें ठरतें. ज्या वेळीं ती तिबेटांत आपल्या गुरूजवळ रहात होती असें मिसेस बेझंट म्हणतात.त्या वेळीं ती कोठल्या तरी देशांत अनैतिक आयुष्य काढीत होती, आणि तिला धार्मिक कल्पना मुळीच नव्हत्या असें तिनें सांगितलें आहे. मिसेस बेझंटना अितकें सुद्धां कळलें नाही की मॅडम ब्लॅव्हॅट्स्की ही जर १८४८ सालीं रशियामधून तिबेटांत जाऊन तेथे सात वर्षे राहून परत आली असली, तर तिने त्यानंतर वीस वर्षे पर्यंत आपलें हें गूढ ज्ञान लपवून कां आणि कोठे ठेवलें होतें? ती १८७४ सालीं आक्साकॉफला लिहि

की ‘ मी अध्यात्मवादी झालें आहें,’ पण तरी देखील ती अजून तिबेटबद्दल किंवा महात्म्यांबद्दल अेक अक्षरही बोलत नव्हती. मीं जी तिची हकीकत वर दिली आहे, तीच तिच्या या पत्रावरून खरी ठरते.

सॉलॉव्हिऑफनेही तिच्यासंबंधी तेंच लिहिलें आहे. त्यांना तिच्याविषयी वैयक्तिक आकर्षण वाटत होतें, पण तिच्या कल्पना पसंत नव्हत्या. कांही दिवसांच्या अवधींत त्यांनीं तिला तीनदां फसवतांना पकडलें. पूर्वीं मध्यस्थाचा धंदा केलेला असल्यामुळे तिला पक्कें माहीत होतें की तात्विक गोष्टींपेक्षा प्रत्यक्ष पुराव्याचा परिणाम जास्त होतो, आणि मध्यस्थ ज्या वस्तु मृतात्म्यांकडून उत्पन्न करवतात ( ! ), त्या तसल्याच युक्त्यांनी तीही उत्पन्न करी, पण ती या चमत्कारांची मीमांसा अशी सांगूं लागली की मनाची पुरी प्रगति झाली की त्याचा जड सृष्टीवर ताबा चालतो आणि लोकांना चमत्कार वाटतील अशा गोष्टी सहज करतां येतात ! तिच्या महात्म्यांना तिच्याशीं बोलायचें असेल तेव्हां अेक लहानशी घंटा वाजत असे, याचा लोकांना चमत्कार वाटे, पण तिच्या झग्यांत ती घंटा लपवलेली असे हें सॉलॉव्हिऑफला समजलें आणि तिने ती त्यांना दाखवली देखील ! तिला महात्म्यांकडून अेका विशिष्ट प्रकारच्या पाकिटांतून पत्रें येत आणि तिने अेकदां सहज अेका टेबलाचा खण उघडला, तेव्हां त्यांना तसलींच पाकिटें त्यांत दिसलीं. तिनें अेकदां त्यांच्या मागणीवरून गूढ शक्तीने हिंदुस्थानांतून गुलाबी अत्तर आणून दिलें, पण तें नारिंगांचें तेल होतें आणि तिला तें विकत घेतांना त्यांनी पाहिलें होतें ! त्यांच्याजवळ तिने या सर्व गोष्टी कबूल केल्या, आणि तिचे अनुयायी जर तिच्या कल्पनेपलीकडे अंधश्रद्धाळू नसते, तर तिने खरोखरच स्वतःचें अत्यंत मनोरंजक चरित्र प्रसिद्ध केलें असतें. पण कांहींही झालें तरी त्यांची श्रद्धा उडत नाही असें पाहिल्यावर तिने तें लिहिलें नाही. सायकिकल रिसर्च सोसायटीने कर्नल ऑल्कॉटना मात्र निर्दोष ठरवलें, तें केवळ त्यांच्या अंधश्रद्धेमुळेच आणि मॅदॅम ब्लॅव्हॅट्स्की हा सॉलॉव्हिऑफजवळ बोलतांना ऑल्कॉटना नेहमी शंख म्हणत असे.

मरूं लागलेल्या जुन्या धर्मांची जागा घेण्याकरतां जो नवा धर्म थिऑसोफी या नांवाने निघाला होता, तो हा असा. अशा प्रकारच्या ज्या तीन धार्मिक संस्थांनी पन्नास वर्षेपर्यंत लोकांच्या डोळयांत धूळ फेकली, त्यासारखें दुसरें उदाहरण जगाच्या अितिहासांत सांपडणें कठिण, आणि हे तिन्ही पंथ अमेरिकेंत निघाले याचें अमेरिकन लोकांना कदाचित् हंसूं येअील. या तिहींपैकी थिऑसोफी सर्वांत अधिक महत्वाची आहे. मॅदॅम ब्लॅव्हॅट्स्कीच्या चरित्राशीं तिचा विशेष निकट संबंध आहे, तरीपण मिसेस बेझंटने आणि त्यांच्या अनुयायांनी त्यांच्या महात्म्यांकडून आणखीही गूढ ज्ञान मिळवलें ! तथापि कांही थिऑसोफिस्ट अजून असें म्हणतात की थिऑसोफी हें अेक महत्वाचें गूढ तत्वज्ञान आहे, तेव्हां त्याचा या दृष्टीने थोडा विचार करणें भाग आहे.

## विलक्षण ज्ञान

तारुण्याचें आकर्षण नाहींसें झालें, आणि मेस्मेरिझमचें व मृतात्म्यांचेंही कांही बरोबर जुळेना, तेव्हां मॅदॅम ब्लॅव्हॅट्स्की गूढवादाकडे कशी वळली हें वर पाहिलेंच आहे. जुने धर्म त्या वेळीं मोडकळीस आले होते, आणि गूढ गोष्टींकडे ज्यांची प्रवृत्ति असते त्यांचें नवीन शास्त्रीय ज्ञानाने समाधान होणें कठिण, यामुळे तो काल गूढतेला अनुकूल होता. बुलवर लिटन आणि रायडर हॅगर्ड यांच्या कादंबऱ्या याच कारणाने लोकप्रिय झाल्या. गूढ या शब्दांतच कित्येकांना मोठें आकर्षण वाटतें. गूढ म्हणजे आपल्यासारख्या थोड्याच निवडक लोकांना तें कळायचें, सामान्य जनतेपेक्षा आपल्यांत कांहीतरी वेगळें आहे, असें वाटायला या शब्दाने मदत होते. अशा वेळीं साहजिकच जुन्या वेडगळ समजुतींना पुनः ऊत आला. कौमार्य, ब्रह्मचर्य, वगैरेंत कांही विलक्षण गुण आहे, आणि मद्य प्यालें नाही किंवा शक्य तितकें कमी अन्न खाल्लें म्हणजे मनाला सत्य जाणण्याची विशेष प्रकारची शक्ति येते, या समजुतींना पुनः उजळा मिळाला.

त्याचप्रमाणें गूढ ज्ञान आणि ज्ञानी पूर्वेकडे असतात, या यूरोपांतल्या समजुतीचाही फायदा थिऑसोफीला मिळाला. ' सेक्रेड बुक्स ऑफ द अीस्ट '

## थिऑसोफीचा अितिहास—३

( पूर्वेकडील पवित्र ग्रंथ ) अिंग्रजींत नुकतेच भाषांतरले होते, आणि सामान्य लोक बायबल जसें वरवर वाचतात तसेंच हेही ग्रंथ वाचूं लागले. हिंदु पवित्र ग्रंथ वस्तुतः गेल्या हजार वर्षांतलेच आहेत, परंतु ते चार हजार वर्षांपूर्वीचे आहेत अशी समजूत होती. थिऑसोफिस्टांना हें हिंदुस्थानांतलें प्राचीन ज्ञान वाटतें, आणि बुद्धाच्या अनुयायांनी जो गोंधळ माजवला आहे, तो देखील बुद्धाच्या नांवावर खपतो. वास्तविक मिसर व बॅबिलोनमध्यें हिंदुस्थानच्याही पूर्वी सुधारणा झाली होती, आणि अभ्यासी लोकांना हें माहीत आहे. पण या गूढवाद्यांना खरें ज्ञान नकोच असतें, अमुक हिंदु ग्रंथ पांचसहा हजार, किंवा चिनी ग्रंथ वीस हजार वर्षांपूर्वीचा आहे असें म्हटलें म्हणजे त्यांतलें स्वप्नवत् वरळणें या लोकांना गूढ ज्ञान वाटतें आणि आधुनिक ज्ञानापेक्षा तें अत्यंत श्रेष्ठ आहे असें ते पुकारतात. खरी स्थिति अशी आहे की या अिंग्रज व अमेरिकन थिऑसोफिस्टांना जेव्हां हें हिंदु ज्ञान सांपडलें, त्याच सुमाराला हिंदु लोक त्या ज्ञानांतून बाहेर पडत होते, आणि पाश्चिमात्य ज्ञान मिळेल तितक्या जलद ग्रहण करीत होते. मॅडम ब्लॅव्हॅट्स्की व मिसेस बेझंट या दोघींनी प्राचीन पौर्वात्य ज्ञानाची कितीही तारीफ केली, तरी हिंदुस्थानांत अेकंदर सात हजारांपेक्षा जास्त थिऑसोफिस्ट नाहीत, आणि तेथील लोकसंख्या तीस कोटींच्या वर आहे (१९२७).

थिऑसोफिस्ट वाङ्मयांत हिंदुस्थानच्या खालोखाल मिसर देशाचा नंबर लागतो. हें तर त्याहीपेक्षा हास्यास्पद आहे. तेथील लोकांचा प्राचीन धर्मग्रंथ म्हणजे ‘ मृतांचें पुस्तक ’ नांवाचा आहे. त्यांत भुताखेतांच्या गोष्टी असून ज्ञानाचा अंशही नाही. प्राचीन मिसरच्या ज्ञानांत चीनप्रमाणेंच नैतिक बाबतींत व्यावहारिक विचार चांगले आहेत, परंतु ज्ञान बिलकुल नाही. जगाच्या उत्पत्तीसंबंधी जी प्राचीन बॅबिलोनिअन कथा बायबलाच्या पहिल्या भागांत (‘जेनेसिस’ मधें ) दिली आहे, तीच त्यांनीहि उसनी घेतली होती. परंतु नंतरच्या धर्मगुरूंनी मात्र हिंदूंप्रमाणेच बराच कीस काढला आहे, आणि तें देखील स्वप्नांतील वरळणेंच आहे. त्यांच्या ‘ आयसिस् ’ या देवीचा ज्ञानाशीं बिलकुल संबंध नाही. त्या देशाचा इराण व ग्रीसशीं संबंध येअी-

पर्यंत ती अेक प्रेमाची आणि सुपीकपणाची प्राथमिक देवी होती, म्हणजे मॅडम ब्लॅव्हॅट्स्की म्हणते त्याप्रमाणें ज्ञानी आणि पवित्र कुमारी नसून बरोबर उलट होती. पण अभ्यासी लोकांनी परिश्रमाने मिळवलेल्या ज्ञानाची मिसेस बेझंटला आणि तिच्या अनुयायांना परवा नसते आणि ते प्राचीन ज्ञानाच्या पोकळ गप्पा मारीत असतात.

हा गोंधळ हट्टाने कायम केलेला आहे, कारण तो थिऑसोफीचा पाया आहे. थिऑसोफीचे अेकंदर तीन उद्देश आहेत असें सांगण्यांत येतें. १ जागतिक बंधुत्वाच्या भावनेला उत्तेजन देणें, २. धर्म, तत्वज्ञान, व शास्त्रें यांच्या तौलनिक अभ्यासाला उत्तेजन देणें, व ३. जड सृष्टीच्या आणि मनुष्याच्या गूढ गुणांचें आणि शक्तींचें संशोधन करणें. यांतला पहिला उद्देश थिऑसोफीमधें प्रारंभीं नव्हता, आणि त्यांत थिऑसोफीचें वैशिष्ट्य कांहीच नाही. हा कां घातला हें पुढें पाहूं. बाकीच्या दोन उद्देशांचा मात्र अेक नवीन धर्म, नवीन तत्वज्ञान बनलें. ही संस्था प्रथम संशोधनाकरतां म्हणून काढली होती, पण मॅडम ब्लॅव्हॅट्स्कीने तिला लवकरच अीश्वरासंबंधी ज्ञानाचा (थिऑसोफी या शब्दाचा अर्थ हाच आहे) मोठा सांठा दिला आणि हें ज्ञान महात्म्यांकडून आल्यामुळे तें सत्य मानणें भाग होतें ! तेव्हा त्याने धर्माचें स्थान घेतलें. मॅडम ब्लॅव्हॅट्स्कीच्या पुस्तकांत 'पूर्वेकडील पवित्र ग्रंथ' आणि आधुनिक शास्त्रीय ज्ञान यांचें अर्धेकच्चें मिश्रण सांपडतें, तेव्हां त्याचा आतां विचार न करतां मिसेस बेझंटने अनेक वेळां थिऑसोफीचीं जीं स्पष्टीकरणें लिहिलेलीं आहेत त्यांचाच विचार करूं. (अपूर्ण).

---

# वारस

लेखक, मनोहर हासूजी डफळे.

नमस्कार. नेहमींच्या पत्रांपेक्षां हें पत्र निराळें आहे. हें वाचून तुला आश्चर्य वाटेल. तरी तूं माझ्यावर रागावणार नाहीस अशी खात्री वाटते.

# वारस

तूं डी. एस्. पी. चा रीडर आहेस. पोलीस खात्यांतील तुझा अनुभव मोठा आहे. तुला कायदेकानू ठीक मुखोद्गत असतील. त्यामुळे अेका गंभीर तऱ्हेच्या फसवेगिरीची, नव्हे गुन्हेगारीची, मी तुला माहिती देत आहें. त्यावर तुझें काय म्हणणें आहे तें कळव.

आमच्या उरळी गांवांत सरकारी दवाखाना आहे. त्यांत मी कंपौंडर आहें हें तुला माहीत आहेच. येथील उत्साही धनिक लोकांच्या प्रयत्नाने गेलीं दोन अडीच वर्षें येथे अेक सूतिकागृह चालवण्यांत येत आहे. तें आमच्याच कंपौंडमधें असून त्याच्या वरच्या मजल्यावर नर्सेस आणि अेक स्त्री डाक्तर रहात असतात. माझी रहायची जागा त्याच कंपौंडमधें आहे आणि आमच्या मेडिकल ऑफिसरच्या आज्ञेवरून रोज अेक तासभर मी सूतिकागृहांत जाऊन औषधें तयार करून देतों. त्याबद्दल मला थोडासा मुशाहिराही मिळतो.

पण तेथे अेक घोटाळा झालाच. सूतिकागृहाच्या व्यवस्थापक मंडळांतील अेका सद्गृहस्थाची दूरची नातेवाअीक असलेल्या कमला नांवाच्या नर्सची माझी ओळख वाढत चालली. ते सद्गृहस्थ चांगले नाणावलेले वकील आहेत. त्यांना पहिल्या लग्नाची अेक कन्या आहे. त्यानंतर त्यांनी लागोपाठ तीन लग्नें करूनही त्यांना संतति झाली नाही. त्यांचे अेक धाकटे बंधु आहेत, त्यांना नाना म्हणतात. त्यांनाही अेक मुलगा झाला व नंतर संतति झाली नाही. त्यांनीही चार-पांच वर्षांपूर्वी अेका तरुणीशीं लग्न केलें, पण व्यर्थ.

वकीलसाहेबांची पन्नाशी उलटून गेली आहे आणि नाना पन्नाशीच्या जवळ येत चालले आहेत. बऱ्याच वर्षांपूर्वी नानांचा मुलगा आकस्मिक ज्वराने वारला होता. त्यामुळे त्यांच्या अफाट अिस्टेटीला वारस असा कोणीच नव्हता. वकीलसाहेबांना खात्री होती, ती सर्व अिस्टेट आपल्या मुलीला मिळणार. पण नानांना ही गोष्ट मुळीच पसंत नव्हती. आतां ते वकीलसाहेबांप्रमाणें तिसरें लग्न करण्याच्या विचारांत होते, कारण अेका काळीं त्यांना मुलगा झाला होता. आतां मूलबाळ होत नाही याचें कारण आपण नसून आपल्या दोन पत्नींमधेंच कांही वैगुण्य असावें अशी त्यांची खात्री होती. वकीलसाहेबांना नानांचा हा

बिनतोड युक्तिवाद नाकारतां येण्यासारखा नव्हता.

कमला गेलीं दोन वर्षें त्यांच्याकडे जात असे, त्यामुळे तिचा नि त्या सद्‌गृहस्थांच्या कुटुंबीयांचा परिचय दृढ वाढत चालला होता. कमला सुंदर होती, तरी वकीलसाहेबांच्या वकिलीमुळे आणि त्यांना अनेकविध चळवळींत लक्ष घालावें लागत असल्यामुळे कमलशीं त्यांचा विशेष परिचय नव्हता. शिवाय ते म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष होते, यामुळे कमल त्यांच्याशीं आदबीनेच वागे.

तशी गोष्ट नानांची नव्हती, ते घरचेंच पहात असत. त्यामुळे बोलणें, हंसणें वगैरे तऱ्हेचा परिचय त्यांचा वाढत चालला होता. अर्थात् त्याविषयी मला वैषम्य वाटण्याचें कारण नव्हतें, तूं डी. एस्. पी. चा रीडर आहेस. या सर्व घडामोडींचा अर्थ लावण्यासाठी तूं सुताने स्वर्गास गेलास तरी माझी हरकत नाही.

वकीलसाहेबांची अफाट अिस्टेट, नानांची व्यवहारी पण कामुक वृत्ति, वगैरेकडे तिची दृष्टि वळली असल्यास नवल नाही. कमलचा नि माझा परिचय होताच...हो सांगायला मी लाजूं कशाला ? अेकाच कंपौंडमधें आम्ही रहात असूं, नि माझ्या पत्नीला रातांधळें आहे, यामुळें सर्व कांही बिनबोभाट चाललें होतें. डाक्तरीणबाअी असल्या कोणाच्याही बाहेरच्या वागणुकीकडे लक्ष देत नसे. सर्वांनी आपआपलीं कामें व्यवस्थेने केलीं की ती खुष असे.

कमलला कांही दिवस गेले असल्याचें माझ्या ध्यानीं आलें. अलीकडे ती त्या वकीलसाहेबांच्या घरीं वारंवार जात येत असे हें मी ओळखलें होतें. पण तिला माझ्याविषयी व्यस्त भाव वाटूं नये म्हणून माझा मत्सर मी गिळीत होतों. त्यावेळीं तिच्या मनांतील कपट मी ओळखूं शकलों नाहीं. तो गर्भसंभव नानांचाच आहे अशी तिने त्यांची खात्री पटवून दिली असली पाहिजे. त्यासाठी कमलची वागणूक चांगल्या तऱ्हेची आहे की नाही याची खात्री करून घेण्यासाठी नाना अेकदां जातीने सूतिकागृहाच्या डाक्तरीणबाअींना भेटून पण गेले होते. त्यांची खात्री पटली, आणि अेके दिवशीं त्यांनी कमलशीं विधिपूर्वक लग्न केलें.

## वारस

या लग्नाला वकिलसाहेबांचा विरोध होता, पण त्यांना नानांच्या हट्टापुढे हात टेकावे लागले. ज्या बाओपासून वारसाची हमखास खात्री वाटली, तिच्याशीं लग्न करण्याचें सोडून दुसऱ्या अेखाद्या कुमारिकेशीं लग्न करून संशय-स्थितींत कोण पडतो ? नानांचें हें म्हणणें बरोबर होतें.

मध्यंतरींचा काळ गेला. मला त्या काळांत किती किती वाओट वाटलें असेल, माझा मनस्ताप कोणत्या थराला गेला असेल, याची तुला कल्पनाच येणार नाही. कमल चतुर होती, तिला जबाबदारीची जाणीव होती. नवीन जगांत वावरत होती ती. त्यामुळें अजूनपर्यंत ठीक चाललेले आमचे व्यवहार अखेरपर्यंत टिकतील अशी मला खात्री होती. पण तिने माझा घात केला. कामापुरता माझा उपयोग करून घेतला. आज कित्येक दिवसांत तिचें मुखावलोकनही झालें नाहीं. मित्रा, आमच्या चोरट्या प्रेमाच्या गोडीची तुला कल्पनाही येणार नाही. आणि तें अमृत त्या नानाने हातचें नेल्यामुळे त्याला गिळावा की चावावा असें झालें आहे मला, पण ही माझी गुन्हेगार वृत्ति मी अद्याप माझ्या काबूंत ठेवली आहे. भिऊं नकोस.

तुझा **मन्या.**

नमस्कार. हें पत्र तुला टाकावें की नाही याचा विचार करीत होतों. चार दिवसांपूर्वीं कमल बाळंतपणासाठी सूतिकागृहांत आली असून तिला मुलगा झाला आहे. आतां ती माझ्याशीं बोलण्याच्या परिस्थितींत आहे. तिच्या माझ्या बोलण्याचा सारांश मी तुला देतों.

आमचा मुलगा कमलच्या तोंडवळ्याचा आहे. किती गुटगुटीत बालक आहे तें ! पण जगांत उघडपणें तें माझें आहे असें म्हणतां येणार नाही. जाऊं दे. भावनांना उगाच ताणवा देण्यांत हशील नाही. सर्व कांही गिळायला शिकलें पाहिजे. पण अेक गोष्ट खरी की नाना कमलला रोज भेटायला येतो. तो त्या मुलाला उचलून घेऊन त्या मुलाचें कोडकौतुक माझ्या देखत करतो. हें पाहून माझें मस्तक भडकून जातें, वाटतें...आणि नाना गेला की कमल माझ्याकडे पाहून मनापासून हंसते. हा तिचा राक्षसीपणा मला बिलकुल सहन होत नाही.

' श्रीमंतींत लोळायला तर मिळेल. शिवाय, मन्याबापू, सौंदर्याला असाध्य असें कांही नाही. '

असा मला राग़ आला होता तिचें हें बोलणें अैकून, की त्याच वेळीं तिला बुकलून बुकलून जिती की मेली करावी असें वाटलें. पण तें होतें सूतिकागृह, डाक्तरीणबाओी त्याच बाजूला येत होत्या. मी त्या रागाच्या भरांत सटकन् तेथून निसटलों. मी कमलला भेटलों नाही त्यानंतर. कालच तिला जायची परवानगी मिळाली. नि मी हा सारखा जळतोंय.

पुन्हा तिचें दर्शन होणार तें ती येथे दुसऱ्या बाळंतपणासाठी येणार तेव्हां ! हाय ! काय करूं ? तूंच सांग कसा तिचा सूड उगवूं. आहे उपाय ?

—तुझा मन्या

---

# ' पहिला पाळणा ' व संततिनियमन

लेखक, गं. द. कुळकर्णी, पुणें.

हितं मनोहारि च दुर्लभं वचः ।
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ।

वरील सुभाषितांत वर्णिल्याप्रमाणें हितकर व त्याबरोबरच मनास संतोष देणारीं वचनें फारच कमी असल्यामुळे जनहितैषी व्यक्तींस पुष्कळ प्रसंगीं लोकांस आवडणार नाहीत अशा गोष्टी बोलाव्या लागतात. पण असें करतांना मनांत शुद्ध हेतु असून देखील समाजाच्या रोषास तोंड देण्याचे प्रसंग येत असल्यामुळे जनमनरंजन हेंच ज्यांचें ध्येय, अशा लोकांकडून असें आचरण होत नाही.

वरील प्रकारचाच प्रसंग ' पहिला पाळणा ' या बोलपटाचे लेखकावर आलेला आहे. सदरहू लेखकाने आपल्या पुस्तकाच्या शेवटीं जे ' दोन शब्द ' लिहिले आहेत, त्यांत पुढीलप्रमाणें वाक्यें आहेत. ' केवळ धंद्याची अेक गरज

म्हणून प्रस्तुत बोलपपटकथा लिहिली आहे. वाङ्मयसेवा, ध्येयवाद किंवा अेखाद्या मताचें प्रतिपादन, असला कोणताही उद्देश ही कथा लिहिण्याच्या मुळाशीं नाही. किंबहुना कथेंत कांही मतांविषयी सहानुभूति उत्पन्न करण्याचा प्रयत्न आढळला तरी तीं मतें स्वतः लेखकाला संमत आहेतच असें नाहीं.' याचा अर्थ अेवढाच की बोलपट आर्थिक दृष्ट्या यशस्वी व्हावा म्हणून लेखकाने आपली बुद्धि निदान तात्पुरती तरी गहाण टाकली आहे. ही स्थिति अत्यंत केविलवाणी होय यांत शंका नाही. पण त्याबरोबरच बोलपटाची ध्येयवादाच्या दृष्टीने किंमत मुळीच उरत नाहीं हें स्पष्ट होतें.

वरील 'दोन शब्दां'वरून दुसरीही अेक गोष्ट लक्षांत येते ती ही की लेखकाच्या या 'न मया, न मया' करण्यांत त्याचा उद्देश अेखाद्या विषयाची टर उडवण्याचा व बहुजनसमाजास आवडणाऱ्या कांही ध्येयांचा उदो उदो करण्याचा असावा. बोलपटाची कथा वाचल्यानंतर लेखकाने संततिनियमनाच्या चळवळीची टर उडवण्याचा प्रयत्न पुष्कळ ठिकाणीं केलेला आहे असें आढळून येतें. संततिनियमनाच्या पेटीवरील अक्षरें वाचून जगन्नाथाचा 'हा कार्टें कुठून आणलेंस हें ?' हा उद्गार, 'तुमच्या बापाला कां नाही दिलींत हीं औषधें...म्हणजे तुम्ही दिवटे जन्माला तरी आलां नसतांत ?' व 'आज जिवतीच्या दिवशीं पोरांच्या गळयाला नखं लावण्याच्या शपथा घ्यायला निघालांत ?' हीं नायकाचे वडील धुंडीराज यांचीं वचनें, आणि बोलपटाचे शेवटीं संततिनियमनाच्या प्रचारकांना जिवतीला नमस्कार घालण्यास भाग पाडून त्या वेळीं त्यांच्यावर केलेले वाक्‌प्रहार, अित्यादि प्रसंगांतून कथालेखकाचा संततिनियमनाची फटफजीति उडवण्याचा उद्देश आहे असा निष्कर्ष काढणें वावगें होणार नाही.

बुद्धिमान मनुष्यास कोणत्याही विषयाची टिंगल करतां येईल, परंतु तेवढ्यावरून त्या विषयासंबंधी कोणत्याही प्रकारची कमी भावना कोणाही सुज्ञ व्यक्तीच्या मनांत उद्भवणार नाही. या दृष्टीने विचार करतां संततिनियमनाविरुद्ध कोणते भरीव मुद्दे प्रस्तुत कथेंत आले आहेत ते आतां पाहूं. कथेचा नायक धनंजय याने नायिका चित्रा हिला 'लग्न करायचें नाही' व मूल होऊं

द्यायचें नाही ' या दोन्ही निश्चयांपासून ढळवलें. परंतु असें करतांना त्यानें किंवा नायिकेनें संततिनियमनाविरुद्ध कोणतेही आक्षेप आणले नाहीत. कदाचित् कोणी असें म्हणेल की नायिकेनें संततिनियमनाच्या साधनांचा उपयोग केला पण तो फसला, यावरून हीं साधनें निरुपयोगी आहेत. पण तसा स्पष्ट उल्लेख कथेंत नाही, व तीं निष्काळजीपणामुळे फसलीं असलीं तर तो दोष साधनांचा नसून वापरणारांचा होय हें उघड आहे.

आतां नायकाचे वडिलांनी प्रचारकांस 'तुमच्या बापाला कां नाही दिलींत हीं औषधं...म्हणजे तुम्ही दिवटे जन्माला तरी आलां नसतांत ? ' हा प्रश्न विचारतांना जें स्वतःच्या अकलेचें प्रदर्शन केलें आहे, तसेंच प्रदर्शन दुसऱ्या प्रश्नांतही आहे. संततिनियमन म्हणजे गर्भाचा संभवच होणार नाही अशी तजवीज करणें होय, व त्याचा गर्भपात व बालहत्या यांच्याशीं काडीअितकाही संबंध नाही, हें आतां प्रत्येक सुज्ञ व्यक्तीस माहीत असलें पाहिजे.

कथालेखकानें संततिनियमनाची जरूरी नाही असें दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. हजार दोनहजार वर्षांनी दुष्काळ पडेल ही भीति संततिनियमनास पुरेसें कारण नसून मागील हजारों वर्षांपासून दुष्काळ पडत आले आहेत व अतिप्रजावृद्धि ही दुष्काळाचीं दुखें वाढवण्यास कारणीभूत होते, म्हणून संततिनियमन करणें योग्य ठरतें. स्थलाभावीं येथे या विषयाची पूर्ण चर्चा करणें शक्य नाही, तरी यासंबंधी संततिनियमनाच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें असें आहे की लागवडीला लायक जमीन अत्यंत मर्यादित आहे, व यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या वांट्यास पुरेशी जमीन येण्यास व ती तशी टिकण्यास लोकसंख्येची वृद्धिहि मर्यादितच झाली पाहिजे. सध्यांचें जननप्रमाण कायम राहिल्यास सामाजिक दारिद्र्यनाश होणें अशक्य आहे.

नायकाचा भाऊ जगन्नाथ टाटास विचारतो ' अहो दहा वर्षांपूर्वी मी अेकटा होतों घरांत. लग्न झालं आणि दसपट झाली आहे आमची लोकसंख्या. काय झालं आमचं ? ' पण अेकतर श्रीमंत अिनामदारांचा आश्रय असल्यामुळे त्याला अितकीं मुलें पोसणें शक्य झालें म्हणजे अितरांस तसेंच होअील, ही

त्याची कल्पना चुकीची आहे. शिवाय मुलें सदा खाण्यासाठी हपापलेलीं व बायको त्यांच्या खस्ता खाण्याने त्रासलेली, अशी परिस्थिति असण्यापेक्षा कोणीही सुज्ञ मनुष्य संततिनियमन श्रेयस्कर समजेल.

जगन्नाथ टाटास पुन्हा विचारतो, ' अन् लढाईला माणसं लागतात का संततिनियमनाचीं औषधं ? ' या त्याच्या प्रश्नांतच लढाईच्या मुख्य कारणाची मीमांसा आहे. कोणत्या माणसांच्या बळावर लढाया लढल्या जातात, याविषयीं विचार केला असतां असें आढळतें की सैन्यांत भरती झालेल्या लोकांपैकी बहुतेक लोक समाजांतील हलाखीस भिऊन व सैन्यांतील पगारास लालचावून त्यांत गेलेले असतात. लोकसंख्येच्या वृद्धीचें नियमन झालें तर समाजांतील बुभुक्षितता नाहीशी होईल व थोड्या श्रमांत निर्वाहाच्या जिनसा प्रत्येक व्यक्तीस मुबलक प्रमाणांत मिळणें शक्य होईल, व ज्या सैन्याच्या बळावर लढाया लढल्या जातात तें सैन्यच बहुतांशीं नाहींसें होईल व मग लढायांचे नांवानिशाण देखील राहणार नाही. जगांतील प्रमुख अर्थशास्त्रज्ञांच्या मतानें लोकसंख्येची निरातिशय वाढ हेंच आधुनिक युद्धांचें प्रमुख कारण आहे.

प्रसिद्ध लेखक बरट्रँड रसेल म्हणतात, 'जी मंडळी तत्वदृष्ट्या संततिनियमनास विरोध करतात, ती अेकतर गणित समजण्यास अगदीं अपात्र असली पाहिजे किंवा लढाया, रोगराई व दुष्काळ ह्या आपत्ति मानवी जीवनास आवश्यक आहेत असें मानीत असली पाहिजे.' त्याचप्रमाणें दुसरे प्रसिद्ध लेखक एच्. जी. वेल्स म्हणतात, ' संततिनियमन हें उदारमतवादी कोण व प्रगतिविरोधी कोण हें ठरवण्याचा माझा निकष आहे. संततिनियमनास अनुकूल असलेले लोक माझे व नवीन जगाचे संवगडी होत व त्याचे विरोधी हे सर्व प्रगतिपर क्रांतीचे शत्रु होत.'

शेवटीं प्रस्तुत बोलपटाचे लेखक श्री. बेडेकर व त्यांच्यासारख्या अितर बुद्धिमान लेखकांस विनंति आहे की त्यांनी आपली बुद्धिमत्ता असल्या लोकोपयोगी चळवळीस विरोध करण्याच्या कामीं खर्च न करतां त्या चळवळीचा जेणेंकरून प्रसार होईल अशी हरअेक प्रकारची खटपट करण्याच्या कामीं लावावी.

---

# प्राचीन आर्यसंस्कृतीचा अेक मासला

रामायण महाभारतादि थोरथोर ऋषींनी लिहिलेल्या प्रासादिक ( इन्स्पायर्ड ) ग्रंथांत कांही सदाचार सांगितले आहेत व तसें श्रेष्ठ आचरण केल्याने कांहींकांहींना अनुपम फलही मिळालें आहे. या आचारांची बरीच स्तुति केलेली आढळते, पण आजच्या या कालीं संस्कृतिसंरक्षक म्हणवणारे सनातनीही हे आचार पाळीत नाहीत हें शोचनीय आहे. यासाठी हे व असले अितर ग्रंथ शोधन करून लुप्त झालेले सदाचार पुन्हा आचारांत आणण्याचा विचार संस्कृतिसंरक्षक मंडळाने जरूर केला पाहिजे. या कामीं त्यांना मदत व्हावी म्हणून अेक कथा देत आहें.

महाभारताचें अनुशासन पर्व आहे, त्यांत १६५ अध्यायापर्यंत युधिष्ठिरानें बारंवार प्रश्न केल्यावरून धर्मांचीं रहस्यें शरपंजरीं पडलेला भीष्म विस्ताराने वर्णीत आहे. या पर्वाच्या दुसऱ्याच अध्यायांत धर्मराजाने प्रश्न केला तो, ' हे पितामह, कोणत्या धर्माचा आश्रय केला असतां गृहस्थाला मृत्यूवर जय मिळवितां येतो, तें मला तत्वतां सांगावें. ' यावर उत्तर म्हणून भीष्माने पूर्वीचा थोडा अितिहास सांगितला आहे, त्याचा सारांश मी येथें देतों.

दुर्योधन या नांवाच्या राजाची कन्या अग्नीने वरिली. त्यांच्यापासून सुदर्शन नामक पुत्र झाला. त्याला ओघवान राजाने आपली ओघवती नांवाची कन्या भार्या म्हणून दिली. तेव्हां सुदर्शन गृहस्थाश्रमी होऊन कुरुक्षेत्रीं तिच्यासह आनंदानें राहूं लागला. त्या बुद्धिमान व तेजस्वी सुदर्शनाने अशी प्रतिज्ञा केली कीं 'गृहस्थाश्रमांतच मी मृत्यूला जिंकीन.' मग तो अग्निपुत्र सुदर्शन ओघवतीला म्हणाला, 'अतिथि दारीं आला असतां त्याला विन्मुख केव्हांही पाठवूं नको. अतिथि ज्या ज्या गोष्टीनें संतुष्ट होअील, मग ती गोष्ट आत्मदान कां असेना, ती तूं निःशंकपणें कर. हें व्रत माझ्या मनांत नित्य घोळतें आहे. अतिथिसंतोषापेक्षा गृहस्थाला अधिक कांहींच नाही. हे सुंदरि, माझा शब्द जर मानायचा असेल तर

हें माझें म्हणणें अेकनिष्ठेने मनांत धर. मी घरीं असलों किंवा बाहेर गेलों असलों तरी तूं अतिथीचा अनादर कधींही करूं नको.' पतीचें भाषण अैकून ओघवती मस्तकावर हात जोडून म्हणाली, 'महाराज, मला आपल्या वचनाबाहेर कांहीच कर्तव्य नाही.'

तो अग्निपुत्र सुदर्शन समिधा आणण्यासाठी बाहेर गेला असतां अेक भव्य ब्राह्मण अतिथि म्हणून आला व ओघवतीस म्हणाला, 'हे सुंदरि, गृहस्थाश्रम जर तुला मान्य असेल तर तूं माझा सत्कार करावा अशी माझी अिच्छा आहे.' अतिथीचें म्हणणें अैकून राजकन्या ओघवतीने वेदोक्त विधीने त्याचें स्वागत केलें व त्याला पाय धुण्यास पाणी व बसावयास आसन दिलें. मग ती त्याला म्हणाली, 'आपल्याला कोणत्या गोष्टीची इच्छा आहे? मीं आपल्याला काय द्यावें?' अतिथीने उत्तर दिलें, 'हे कल्याणि, तूंच मला पाहिजे आहेस. तरी गृहस्थाश्रमधर्म तुला मान्य असल्यास स्वतःचें दान करून तूं मला संतुष्ट कर.' त्याला अितर अिष्ट वस्तु देण्याचें मान्य करून ओघवती त्याचें मन फिरवूं लागली, पण तो दुसरें कांहीच घेण्याचें मान्य करीना. तेव्हां ओघवतीला पतिवचनाचें मूळापासून स्मरण झालें आणि हंसत हंसत 'ठीक आहे' असें तिने अतिथीला सांगितलें. मग तो ब्राह्मण स्मित करीत घरांत गेला व गृहस्थाश्रमाचें पालन करूं इच्छिणाऱ्या पतीच्या शब्दांची आठवण करीत ओघवती सुद्धा त्याच्या बरोबर गेली.

अितक्यांत समिधा घेऊन सुदर्शन परत आला. त्याने 'कोठे ग गेलीस?' अशी ओघवतीला दोनचार वेळां हांक मारली. पण ओघवतीने पतीच्या हांकेला ओ दिली नाही. कारण त्या ब्राह्मणानें दोन्ही हातांनी तिला धरून ठेवलें होतें. आपण उष्टी झालों असें वाटून लज्जित झाल्यामुळे ती साध्वी स्तब्ध राहिली. तेव्हां सुदर्शनाने पुन्हा हांक मारली व तो म्हणाला, 'ती साध्वी गेली तरी कोठें? ती पतिव्रता व सत्यवचनी असून अगदी सरळ स्वभावाची आहे. नित्याप्रमाणें ती प्रेमाने आज कशी पुढें येत नाही?' तेव्हां झोपडीच्या आंत असलेला ब्राह्मण म्हणाला, 'हे अग्निपुत्रा सुदर्शना, मी ब्राह्मण अतिथि म्हणून तुजकडे आलों असतां तुझी भार्या माझी मनधरणी करीत आहे. तिच्या विविध सत्कारा-

मुळे मी तिला वरिलें आहे व त्याला अनुसरून ती सुंदरी माझी सेवा करीत आहे. या बाबतींत तुला योग्य दिसेल तें तूं कर.' सुदर्शनाने मत्सर व राग यांचा त्याग केलेला असल्यामुळें हंसत हंसत तो म्हणाला, 'हे ब्राह्मणा, तुमची क्रीडा चालूं द्या. मला त्यांत फार संतोष आहे. घरीं आलेल्या पाहुण्याचा सत्कार करणें हा गृहस्थाचा श्रेष्ठ धर्म आहे. याहून श्रेष्ठ धर्म नाही असें विद्वान लोक म्हणतात. माझें व्रतच आहे कीं प्राण, भार्या, किंबहुना माझें म्हणून जें कांही द्रव्य आहे, तें अतिथीला द्यावयाचें.'

ही कथा सांगून भीष्म म्हणाला, 'युधिष्ठिरा, सुदर्शनाने मृत्यु, आत्मा, लोक, पंचभूतें, बुद्धि, काल, मन, आकाश, काम, क्रोध या सर्वांना जिंकलें. यावरून गृहस्थाश्रमी पुरुषाला अतिथिसत्काराहून दुसरें दैवत नाही ही गोष्ट नीट लक्षांत घे. अतिथिपूजन आणि ब्रह्मचिंतन यांची योग्यता शंभर यज्ञांनाही येणार नाही असें ज्ञाते म्हणतात. घरीं आलेल्या शीलवान अतिथीचा जो सन्मान करणार नाही, त्याला तो अतिथि आपलें पाप देवून त्याचें पुण्य हिरावून घेतो.'

गृहस्थाचा श्रेष्ठ धर्म काय आहे हें या कथेंत स्पष्ट सांगितलें आहे. तो धर्म पाळण्यास सुदर्शनाने आपल्या भार्येस ताकीद दिली होती, व पतीची आज्ञा आठवेपर्यंत तिला अतिथीची मागणी गैर वाटली पण त्या आज्ञेचें स्मरण झाल्या-वर ती हंसत हंसत त्या अतिथीबरोबर झोपडींत गेली.

हा आचार सनातन्यांना मान्य असावा. पतीची आज्ञा तंतोतंत पाळणें हा पतिव्रतेचा धर्म येथे आचरला आहे, यामुळे तिचें पातिव्रत्य भ्रष्ट झालें नाहीं. पतीची अिच्छा तीच सतीची अिच्छा. स्त्रीला स्वातंत्र्य नाही, ही सनातनी नीति येथे प्रमुखत्वाने झळकते.

आर्यसंस्कृतीचा अभिमान टाकून सदसद्विचार आपल्या विवेकशक्तीच्या जोरावर करणाऱ्या नवनीतिवाद्यांना पतीच्या आज्ञेचें थोतांड मान्य नाही. ही त्यांच्या मतें अनीति आहे. समागम उभयतांच्या स्वतंत्र खुषीने झाल्यास ती अनीति नव्हे. केवळ नवऱ्याच्या आग्रहाखातर समागम होऊं दिल्यास ती अनीति होते.

**भा.**

# ग्रंथपरीक्षण

**१. नीलिमा.** लेखक, बाबूराव अर्नाळकर; प्रकाशक, मधुकर अर्नाळकर; पुष्पा प्रकाशन, २५५ गिरगांव रोड मुंबअी, ४. पृ. ११५, किं. सवा रु.

एकंदर गोष्टी चांगल्या आहेत. परंतु अतिशयोक्ति करण्याची लेखकाला थोडीशी संवय आहे. बाबा ठाकूरसारख्या कठोर माणसाच्या वाऱ्याला कोणतेंही मूल जाअील हें संभवत नाही. तुरुंगांतील कैद्यांविषयी लेखकाला वाटणारी सहानुभूति अभिनंदनीय आहे, परंतु तुरुंगाची अेकच वारी केलेल्या अेखाद्या अिसमाला लेखक आपल्या घरीं नोकरीला ठेवून घेतील काय? ' मेहुणा ' या गोष्टीचें कथानक चटकदार आहे, पण विनोद साधायला पाहिजे होता अितका साधला नाही. ' चित्रेची आअी ' ही गोष्ट मात्र उत्कृष्ट आहे. सावत्र आअीची बाजू लेखकाने सुंदर मांडली आहे. यंत्रांसंबंधीही लेखकाचे विचार माणुसकीला धरून आहेत, परंतु मजूर बेकार होतात म्हणून यंत्रांना मूठमाती द्यावी हा युक्तिवाद फोल आहे. त्यापेक्षा मजुरांना आपली संतति बेतांत ठेवून मजुरांची संख्या फाजील वाढूं न देण्याचें धोरण शिकवावें. तसेंच यंत्रांच्या वाढत्या वापराबरोबर मजुरांनी संघटना करून आपलें वेतन वाढवण्यासंबंधी व कामाचे तास कमी करण्यासंबंधी खटपट करावी.

अलीकडील लेखकांच्या भाषेसंबंधी अेक गोष्ट फिरून सांगावीशी वाटते ती ही की भाषा शुद्ध असावी. अवतरणचिन्हांत येणारे शब्द आपण बोलतों तसे लिहिले तरी क्षम्य आहे. पण लेखक जेव्हां स्वतःचें म्हणून लिहितो, तेव्हां ( पृ. २३ ) 'निराशेनं, झालं, गेलं,' असे शब्दप्रयोग अशुद्ध व निष्काळजीपणाचे वाटतात.

**शकुंतला परांजपे.**

**२. तृष्णा.** लेखिका, नलिनी मुळगांवकर बी. ए.; प्रकाशक, बा. द. सातोस्कर, सागरसाहित्य कार्यालय, त्रिभुवन रोड, मुंबअी ४. पृ. ११२, किंमत सवा रु.

बालपणांत गरिबीचा कडू अनुभव आल्यामुळे श्रीमंत नवरा पटकावायचा हें ध्येय ठेऊन मंजुळा मुकुंदाशीं लग्न करते. तोही लहानपणीं दारिद्र्यांत वाढलेला असून आपल्या कर्तबगारीवर श्रीमंत झालेला असतो. पैशालाच जग विचारतें, हें एकच सत्य मनाशीं बाळगून तो सर्वांशी फटकून वागतो. लग्न झाल्यानंतर मंजुळेला हा त्याचा निष्ठुर आणि तुसडा स्वभाव कळतो व ती खिन्न होते. अशा स्थितींत तिला मुलगी होते, परंतु श्रीमंतांच्या रीतीप्रमाणें तिचेंही लालनपालन सर्वस्वीं नोकरांच्या हातीं असल्यामुळे मंजुळा तिलाही पारखी होते. अशा तऱ्हेने अप्रत्यक्षपणें मुकुंदाने तिच्यावर लादलेल्या अेकलकोंड्या अैश्वर्याचा तिटकारा येऊन ती अेका ग्रामोद्धारकाबरोबर पळून जाते. येथपर्यंत कथानक ठीक आहे. पुढें या ग्रामोद्धारकाला लेखिकेने बलात्काराने नीच व व्यसनी बनवलें आहे. तो अितका व्यसनी असता तर त्याला खेड्यांत ग्रामोद्धारक म्हणून कोणी उभा करता ना. मंजुळा गेल्यानंतर मुकुंदाच्या स्वभावांत आलेला सौम्यपणा चांगला रंगवला आहे. मात्र १४ व्या प्रकरणांतील त्याचा शारदेबरोबर झालेला संवाद अगदी अशक्य वाटतो. दोन अपरिचित स्त्रीपुरुष अितक्या हमरीतुमरीवर येऊन बोलणार नाहीत.

**शकुंतला परांजपे**

**३. संक्रमण**. लेखक, व. शा. वरखेडकर, बी. ए; प्रकाशक ब. गो. गर्गे, वीणाप्रकाशन, सीताबर्डी, नागपूर. पृ. १२६, किंमत दीड रु.

या लेखनप्रकाराला कथानकाच्या कमरतेपायीं कादंबरी म्हणतां येणार नाही. प्रत्येक पात्र आळीपाळीने आपापली बाजू मांडीत असतें. जणूं सातआठ मंडळींच्या रोजनिशींतलीं अधलींमधलीं पानेंच आपण वाचीत आहों असा भास होतो. प्रत्येकाचें हृद्गत त्याचेकरवीं वदवण्याचें काम लेखकाने नाजूक रीतीने केलें आहे. प्रत्येकाचें मन हळूहळू कसें बदलतें हें त्यांनीं चांगलें दाखवलें आहे. मनोव्यापारांचें दर्शन घडवणें हाच लेखकाचा मुख्य उद्देश आहे, आणि त्याकडेच त्यांनी सर्व लक्ष पुरवलें आहे. या पुस्तकांत जे कांहीं थोडे प्रसंग घडतात, त्यांना उठाव देण्याचा व ते वाढवण्याचा त्यांनी यत्किंचितही प्रयत्न

केलेला नाही. तो केला असता तर या लेखनप्रकाराला कदाचित् कादंबरीचें रूप प्राप्त झालें असतें. पुस्तकाच्या सुरवातीस आत्मप्रीतीकरतां माणूस जगतो हा सिद्धांत त्यांनी मांडला आहे. ही प्रस्तावना सुद्धां त्यांना माधवच्या रोजनिशींत घालतां आली असती. मालती व आक्काचा नवरा हीं पात्रें वाजवीपेक्षां भडक रंगवलीं आहेत. बापाच्या दुर्वर्तनाचा दाखला सदोदित आपल्या मुलासमोर राहूं नये म्हणून आक्का त्याला घेऊन माधवकडे राहते. परंतु तसें केल्याने समाज आपल्यावरच तुटून पडेल व त्याचीं कडू फळें मुलाला भोगावीं लागतील, हें लक्षांत येतांच ती तत्काळ माधवला सोडून बापाकडे जाते. आअीला मुलापुढें अितरांची किंमत किती थोडी वाटते, हें अितक्या सुंदर रीतीने दाखवलें आहे की लेखकाचें राहून राहून कौतुक वाटतें व लेखकाचें हें पहिलेंच प्रकाशन आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे तें द्विगुणित होतें.

भाषा कांहीं कांही ठिकाणीं अशुद्ध व चमत्कारिक आहे. उदा० 'आणेन' ( पृ. १८ ), 'पण ती पहिलीची मालती राहिली नाही' ( पृ. ३८ ), 'पहिले पहिले ती वर्गातल्या मुलींच्या वह्या....तपासत बसलेली असे' ( पृ. ८१ ).

**शकुंतला परांजपे**

---

# पत्रव्यवहार

शास्त्रीय लैंगिक वाङ्मयाचे चिकित्सक अभ्यासू अशा आपणास व आपल्या मासिकाच्या असंख्य वाचकांस पुढील गोष्टी माहीत व्हाव्या, ह्या हेतूने हा मजकूर आपणाकडे पाठवीत आहें.

नासिक येथें 'सार्वजनिक वाचनालय' नांवाचें अेक वाचनालय आहे. तें शंभर वर्षांचें जुनें असून गतवर्षीच त्याचा शतसांवत्सरिक उत्सव साजरा करण्यांत आला होता. वाचनालयाचे सुमारें ६०० वर्गणीदार आहेत. त्यांनीच निवडलेलें असें एक बारा जणांचें कार्यकारी मंडळ वाचनालयाची व्यवस्था पाहतें. यंदांचे निवडणुकींत गेलीं २-३ वर्षें निवडून आलेले जुने सात, व अगदी नवे असे पांच कार्यकारी सभासद निवडून आलेले आहेत.

## पत्रव्यवहार

' समाजस्वास्थ्य ' हें मासिक गेलीं ५-६ वर्षें नियमितपणें वाचनालयांत येत असे. परंतु यंदां वर्षारंभीं वृत्तपत्रें आणि मासिकें यांची निवड जेव्हां कार्यकारी मंडळाने केली, तेव्हां समाजस्वास्थ्य हेंच मासिक तेवढें नवीन यादींतून वगळलें. वाचनालयांत समाजस्वास्थ्याचे वाचक बहुसंख्य असल्याने अनेक वर्गणीदारांनी कार्यकारी मंडळाच्या ह्या निर्णयाविरुद्ध तकार केली व कार्यकारी मंडळाने फेरविचार करून ' समाजस्वास्थ्य ' पुन्हा चालू करावें अशी विनंति केली. परंतु कार्यकारी मंडळाने या विनंतीचा अव्हेर केला. तेव्हां कांही सभासदांनी वाचनालयाच्या घटनेनुसार वाचनालयाच्या साधारण सभेच्या तांतडीच्या बैठकीची वरील गोष्टींचा विचार करण्याकरतां मागणी केली. रविवार ता. २२-३-४२ रोजी ही बैठक होऊन तींत ' समाजस्वास्थ्य ' व ' जीवन ' हीं लैंगिक विषयाची मूलगामी व शास्त्रीय चर्चा करणारीं मासिकें वाचनालयांत घेण्यांत यावीं, या आशयाचा ठराव बहुमताने पसार झाला.

या सर्व प्रकरणांत नेहमींप्रमाणें श्लील अश्लीलतेचे ठराविक मुद्दे कार्यकारी मंडळाकडून उपस्थित करण्यांत आले. संस्कृतिविध्वंसक, नीतिविघातक, समाजहितनाशक, असलें वाङ्मय या मासिकांमधून येत असतें, वाचनालयांतील कोंवळ्या सभासदांवर विपरीत परिणाम होईल, वगैरे वारंवार उगाळलेले मुद्दे चिटणीसांनी सावेश मांडले. ह्या मासिकांच्या पुरस्कर्त्यांकडून पुढील विचारसरणीचा अवलंब करण्यांत आला होता. १. वाचनालयाचें स्वास्थ्य व सुरक्षितता लक्षांत घेऊन कायद्याच्या नियमित कक्षेंत राहून ज्या मुद्रणसंस्था आपलें प्रकाशन करीत असतील, त्या प्रकाशनाला वाचनालयांत साधारणपणें प्रतिबंध असूं नये. २. वरील तत्वाला बाध येऊं न देतां व वाचनालयाच्या मर्यादित अर्थसंचयावर लक्ष ठेवून कुठल्याही धर्माचें, समाजाचें, विचारसरणीचें वा मतपंथाचें प्रकाशन जास्तींत जास्त उपयुक्ततेवर भर देऊन वाचनालयाकरतां घेण्यांत यावें. ३. वाचनालयाचे सर्व सभासद सुशिक्षित, सुबुद्ध व सुजाण असल्याने आपण काय वाचावें व काय वाचूं नये, ह्या बाबतींतला स्वयंनिर्णयाचा अधिकार त्यांना आहे. कार्यकारी मंडळाने आपले पूर्वग्रह साधारण वाचकांवर लादूं नयेत. वाचकांच्या

विवेचक शक्तीचा त्यांत अधिक्षेप आहे.

या विचारसरणीचा अिष्ट तो परिणाम होऊन सर्वसाधारण सभासदांनीं स्वेच्छेनें ‘ समाजस्वास्थ्य ’ व ‘ जीवन ’ हीं मासिकें घेण्याचें ठरवलें, हें आपणास कळवण्यास आनंद होत आहे. आपला **अेक वाचक**

---

# शारदेचें पत्र

पुण्याच्या **अग्रणी**ने अेका अग्रलेखांत दिवेकरशास्त्र्यांच्या ‘नवा हिंदुधर्म’ या ग्रंथाचें स्वागत केलें आहे, आणि ग्रंथाबद्दल सहानुभूति व्यक्त केली आहे. दिवेकरशास्त्र्यांनी बरेच कष्ट केले आहेत आणि संकटेंही सोसलीं आहेत, तेव्हां त्यांचीं मतें पसंत नसलेल्यांनाही त्यांच्याबद्दल सहानुभूति वाटेल, पण त्या संकटांमुळें त्यांचीं मतें ग्राह्य मात्र ठरत नाहीत. कट्टर सनातन्यांच्या मानानें त्यांचीं मतें पुष्कळच अधिक सुधारलेलीं आहेत हें खरें, आणि यामुळे हीं सर्वच मतें **अग्रणी**कारांनाही मान्य नाहीत. उदाहरणार्थ, ‘सर्व वर्ण व सर्व जाति नष्ट होऊन हिंदुसमाज एकजिनसी व्हावा, ईश्वर-पुनर्जन्म, अित्यादि उपयोगी म्हणूनच श्रद्धेय असावे, मद्यपाननिषेधाप्रमाणें मांसाहाराचा निषेध शक्य नाही ’ हीं मतें त्यांना त्याज्य वाटतात. यावरून **अग्रणी**कार किती मागासलेले आहेत हें स्पष्ट दिसतें. पण हीं सर्वच मतें बुद्धिप्रामाण्याचा आव आणणाऱ्या दिवेकरशास्त्र्यांना शोभण्यासारखीं नाहीत. खोट्या गोष्टींचा उपयोग आहे म्हणून त्यांवर श्रद्धा ठेवावी असें म्हणणें म्हणजे जनतेची फसवणूक आहे, आणि धर्माच्या नांवावर अशी फसवणूक करणें ही सोदेगिरी आहे. अशा तऱ्हेची फसवणूक सर्वच धर्म आजपर्यंत करीत आले आहेत, तेव्हां नव्या हिंदुधर्मालाही करणें भाग आहे, अेरवीं तो धर्मच होत नाही, अशी दिवेकरशास्त्र्यांची कदाचित् कल्पना असावी, पण बुद्धिप्रामाण्यवाद्यांच्या दृष्टीने धर्म या शब्दाला देखील आज जो कमीपणा आला आहे, तो या फसवणुकीमुळेंच. तेव्हां **अग्रणी**कार म्हणतात त्याप्रमाणें सनातनी तर या धर्माचें स्वागत करणार नाहीतच, पण नव्या विचाराचे लोक देखील करणार नाहीत.

## शारदेचें पत्र

दिवेकरशास्त्र्यांच्या ' आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष ' या पुस्तकासंबंधी हायकोर्टाने विरुद्ध निकाल दिल्यामुळे, ' आर्यसंस्कृति जगांत श्रेष्ठ आहे, ' असें लिहायची आतां चोरी झाली, याबद्दल **अग्रणी**कारांना मोठा विषाद वाटतो. अशीं घमेंडखोर विधानें प्रत्येक धर्माचे लोक करीत असतात, यावरून अशा विधानांची किंमत काय हें समंजस माणसांना तेव्हांच समजतें. आज अिंग्रज लोक आपण ख्रिस्ती संस्कृतीकरतां लढत आहोंत असें म्हणून त्यांच्या बाजूने लढणाऱ्या अितरधर्मीय लोकांना मूर्ख ठरवीत आहेतच की नाही ? अशीं विधानें कोण कबूल करील ? आणि तीं न केल्याने काय बिघडेल ? जी आर्यसंस्कृति हिंदुस्थानाला गुलामगिरींत लोटण्यास कारण झाली, किंवा निदान गुलामगिरींतून वांचवूं शकली नाही, तिची अशी टिमकी वाजवण्यांत काय अर्थ आहे ? आमच्या पूर्वजांनी पराक्रम केले, पण आम्ही मात्र आतां नेभळे झालों आहोंत, असाच त्याचा अर्थ होत नाही काय ?

पु. य. देशपांड्यांच्या **भवितव्यांत** जीं ग्रंथपरीक्षणें येतात, तीं अेकापेक्षा अेक विलक्षण असतात. अेका अंकांत माडखोलकरांच्या ' नागकन्ये 'चें परीक्षण आलें आहे. हें पुस्तक मीं वाचलेलें नाही, पण तरीदेखील परीक्षकाने जे आक्षेप घेतले आहेत ते विलक्षण वाटतात. ते म्हणतात, ' हें पुस्तक म्हणजे माडखोलकरांचें अेक दिवास्वप्न आहे ' आणि म्हणून ती कलाकृति नव्हे असें त्यांचें म्हणणें आहे, कारण कलाकृतीची ते अशी व्याख्या देतात की ' परमाकांक्षेच्या प्रतीतीचा वस्तुनिष्ठ आविष्कार म्हणजे कलाकृति. ' ही व्याख्या मला मुळीच कबूल नाही, आणि ती देशपांड्यांच्या कादंबऱ्यांना देखील लागू होणार नाही. कला या शब्दाचा अेक सर्वमान्य अर्थ आहे, तो हा की सौंदर्य हाच कलेचा प्राण आहे आणि सौंदर्य म्हणजे ज्यापासून मनाला आल्हाद होतो तें. अमुक वस्तु सुंदर आहे की नाही, याबद्दल मतभेद होअील, पण म्हणून या व्याख्येला बाध येत नाही. या परीक्षकाची व्याख्या मान्य केल्यास महाभारतासारख्या काव्याला देखील कलाकृति म्हणतां येणार नाही ! असली मूर्खपणाची व्याख्या कोण कबूल करील ? हे गृहस्थ मार्क्सवादी दिसतात, कारण

ते म्हणतात, ‘ ही कहाणी माडखोलकरांचें अेक दिवास्वप्न आहे. प्रतिकूल अशा परिस्थितीच्या वस्तुनिष्ठ संघर्षांतून प्रतीत झालेलें असें परमोद्दिष्ट हें नव्हे.’ हें मार्क्सवादी गौडबंगाल प्रत्येक कादंबरींत असलें पाहिजे असें मला वाटत नाही.

या परीक्षणाला मी विलक्षण म्हणतें याचें मुख्य कारण म्हणजे हे मार्क्सवादी गृहस्थ माडखोलकरांना अेक प्रश्न विचारतात, तो असा की ‘ ज्या कहाणींत अमेरिकन तरुणीअैवजीं अेक हिंदु तरुणी आहे, हिंदु तरुणाअैवजीं अेक मुसलमान तरुण आहे, दोघेही नागकन्येंतीलच भाषा बोलतात, आणि हिंदु–अमेरिकन संभोगाअैवजी मुसलमान–हिंदु संभोग कांही तासांच्या अवधींत अेका हजरतच्या थडग्यावर अश्रू ढाळीत ढाळीत पार पडतो, अशी अेखादी कहाणी तुम्ही लिहूं शकाल काय ?...अशा प्रकारची दुसरी अेक कहाणी तुम्ही लिहा, सारे कलोपासक तुमचा जयजयकार करतील. लिहाल काय अशी गोष्ट ? ’ याचें उत्तर मला असें वाटतें की अशी कहाणी माडखोलकर लिहिणार नाहीत. याचें कारण याच परीक्षकाने सांगितले आहे की ‘ त्यांनी ही कहाणी लिहिण्यासाठी सोअीस्कर उपकरणांचीच मदत घेतली आहे.’ मग हा प्रश्न विचारण्याची काय जरूर होती ? योग्य पात्रांची निवड करणें हा समंजसपणा नव्हे काय ? अशी कोणती कहाणी आहे की ती वाटेल त्या पात्रांना लागू पडेल ? योग्य पात्रांची निवड करण्यांतच कलावंतांचें कौशल्य आहे, आणि हे परीक्षक याबद्दल माडखोलकरांना नांवें ठेवतात ! हे गृहस्थ मार्क्सवादी–नव्हे मार्क्सवेडे-आहेत, यापलीकडे मला यांचें कांही कारण दिसत नाही. अशा लोकांकडे पुस्तकांचीं परीक्षणें सोंपविणें हा मात्र शहाणपणा नव्हे. देशपांडे मार्क्सवादी असले तरीं मार्क्सवेडे नाहीत असें मी धरून चालतें. तेही तसेच असले तर मग काय सगळाच वेड्यांचा बाजार आहे !

यानंतरच्या अेका अंकांत मामा वरेरकरांच्या ‘ उडती पांखरें ’ या नाटकाचें परीक्षण आलें आहे. हें नाटक मी पाहिलें आहे आणि वाचलेंही आहे, आणि मला ते मामांच्या उत्कृष्ट नाटकांपैकी अेक वाटतें. अितकेंच नव्हे तर येथील कांही तज्ञांना तें पसंत पडल्यामुळेंच त्याची निवड झाली. पण भवि-

तव्याचे परीक्षक त्या नाटकाला टाकाऊ ठरवतात. या नाटकाचा अेकच प्रयोग आजपर्यंत झाला आहे, तेव्हां त्यांनी तें बहुधा 'पाहिलें नसावें, आणि त्यांनीं तें धडसें वाचलेलेंही दिसत नाही, कारण त्यांनी नाटकांतल्या चुलत्याला बाप म्हटलें आहे. ही चूक कोणाला क्षुल्लक वाटेल, कारण मामांवर आक्षेप घेणाऱ्या अेका शहाण्यांनी हींच चूक केली होती, आणि तिची चर्चाही झाली होती, आणि ही क्षुल्लक चूक आहे असें त्यांनी समर्थन केलें होतें. आक्षेप घेण्या-करतांच म्हणून ज्यांनी तें वाचलें असेल त्यांची गोष्ट वेगळी, पण परीक्षण कर-णाराने अशी चूक करतां नये. तें अेक असो, पण या परीक्षकाला थोडी कल्पनाशक्ति देखील नसावी हें आश्चर्य आहे. नाटक हें केवळ वाचण्याकरतां लिहिलेलें नसतें, तें प्रयोगाकरतां लिहिलेलें असतें, आणि तें वाचतांना केवळ कादंबरीप्रमाणें वाचून भागत नाही, तें रंगभूमी-वर कसें दिसेल याची जर योग्य कल्पना करतां आली तरच त्यांतलें स्वारस्य कळेल, ती जर करतां आली नाही तर त्या नाटकाचा गोळाबेरीज अर्थ कदाचित् कळेल, पण ज्याला अितकी कल्पनाशक्ति नाही त्याने नाटकाचें परीक्षण करण्याचें धाडस करूं नये. प्रस्तुत परीक्षकाला नाटक बिलकुल कळलेलें नाही. नाटकांत कोणते गुण असावेत हें त्यांनी कोठेतरी पाठ केलेलें असावें, आणि त्या गुणांची यादी त्यांनी दिली आहे. पण ते सर्व गुण या नाटकांत आहेत याची कल्पना त्यांना आली नाही. ते म्हणतात, या नाटकांत प्रसंगच नाहीत. म्हणजे हें नाटक केवळ संभाषणात्मक आहे असें त्यांचें म्हणणें दिसतें. पण नाटक पाहिलेला कोणताही मनुष्य असें म्हणेलसें वाटत नाही. अर्थात् मामांचे जे ठरलेले शत्रु आहेत ते मामांची निंदा करण्याकरतां नाटक वाअीट म्हणतील हें ठरलेलेंच आहे. पण मामांनी कांहीतरी चांगली नाटकें लिहिलेलीं आहेत हें या गृहस्थांना कबूल आहे, तेव्हां ते केवळ शत्रुच असतील असें वाटत नाही. पण नाटकांत काय असावें हें मामांसारख्या कसलेल्या नाटककाराला सांगतांना त्यांनी थोडातरी विचार करायला पाहिजे होता. हा विचार त्यांना सुचला नाही. पाठ केलेली यादी त्यांनी देऊन टाकली आहे झालें! मी तर असें म्हणतें की

मामांनी आजपर्यंत पुष्कळ चांगलीं नाटकें लिहिलीं आहेत, तरीपण या दर्जाचें नाटक त्यांनी अजूनपर्यंत लिहिलेलें नव्हतें, आणि तें अळतेकरांसारख्या कुशल दिग्दर्शकाने बसवल्यामुळे उत्कृष्ट झालें होतें. दुर्दैवाने आयत्या वेळीं त्यांतल्या एका प्रमुख पात्राचा आवाज बसला, आणि विजेच्या दिव्यांत कांही घोटाळा झाल्यामुळे शेवटच्या अंकांत रंगभूमीवर जवळजवळ अंधार होता, यामुळे तें वठावें तसें वठलें नाही, परंतु ही मामांची चूक नव्हे. तुझी **शारदा**

---

# मोठ्या लोकांचा बावळटपणा

मृतात्म्यांवर पोट भरणारे लोक सर ऑलिव्हर लॅाज या शास्त्रज्ञाचें नांव नेहमी पुढें करीत असतात, कारण त्यांचा मृतात्म्यांच्या अस्तित्वावर विश्वास होता. अशाच प्रकारचा बावळटपणा आणखीही कित्येक प्रसिद्ध लोकांनी केलेला आहे.

केप्लर व न्यूटन या दोघांचींही नांवें ज्योतिषशास्त्रांतील शोधांबद्दल प्रसिद्ध आहेत. परंतु केप्लरचा फलज्योतिषावर विश्वास होता हें पुष्कळांस माहीत नसेल. तसेंच बायबलांतील जुन्या करारांत ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकांत होऊन गेलेल्या डॅनियल नांवाच्या मनुष्यानें केलेलीं भविष्यें आहेत, त्यांवर न्यूटनची अढळ श्रद्धा होती. लॅाँब्रोझो नांवाचा अेक प्रसिद्ध डाक्तर अेकोणिसाव्या शतकांत इटलीमध्यें होऊन गेला. तो गुन्हेगारांचीं कारस्थानें हुडकून काढण्यांत वस्ताद होता, पण अेक बुटांची जोडी स्वेच्छेने निजायच्या खोलींतून निघून अेक जिना उतरून खालच्या अेका खोलींत सहल करून आली, ही गोष्ट त्याला खरी वाटली ! वनदेवतांसारख्या केवळ काल्पनिक व्यक्तींच्या अस्तित्वावर सर आर्थर कॉनन डॅाअिल यांचा विश्वास होता, अितकेंच नव्हे तर कांही लोकांना त्या प्रत्यक्ष दिसून त्यांचे त्यांनी फोटो देखील घेतल्याचें त्यांनी अेका पुस्तकांत लिहिलें आहे. प्रत्यक्ष डोळ्यांना दिसत असलेल्या गोष्टी देखील कित्येकांना खऱ्या वाटत नाहीत. उदाहरणार्थ जेवतांना आपला फक्त खालचा जबडा तेवढाच हालतो हें कोणालाही

दिसेल, पण ऑलिव्हर गोल्डस्मिथ यांचे मतें आपण खातांना फक्त वरचा जबडा हालवतों, आणि याबद्दल त्यांनी अेकदां भांडण केलें होतें, असें मेकॉलेनें लिहिलें आहे. ॲंड्रू लॅंग नांवाच्या प्रसिद्ध स्कॉच लेखकाने एन्सायक्लोपीडिआ ब्रिटॅनिका या कोशांतील अेका लेखांत लिहून ठेवलें आहे, "मला अशीं दोन उदाहरणें प्रत्यक्ष माहीत आहेत. त्यांपैकी अेकांत अेक मनुष्य घरापासून दूर असतां त्याला स्वप्न पडलें की आपण आपल्या घरांत शिरलों, आणि त्याच वेळीं तो घरांतल्या माणसांनाही दिसला, आणि दुसऱ्या अेका मनुष्याला असेंच स्वप्न पडलें तेव्हां तो घरांतल्या माणसांना प्रत्यक्ष दिसला नाही, पण त्याचा आवाज मात्र स्पष्ट अैकू आला!" अशा प्रकारच्या गोष्टी लिहिणारे प्रसिद्ध लेखक सांपडतात, आणि ते एन्सायक्लोपीडिआसारख्या कोशांत घालणारे संपादकही असतात. तेव्हां विश्वास कोणावर ठेवावा हा मोठा प्रश्न आहे. निदान अेखादा मोठा मनुष्य म्हणतो अेवढ्या पुराव्यावर कोणत्याही असंभाव्य गोष्टीवर विश्वास ठेवतां नये, अितकें तरी यावरून स्पष्ट दिसतें.

---

# ॲसोसिअेशन ऑफ ऑथर्स, कंपोझर्स ॲंड रायटर्स

वरील संस्थेचा १९४१ सालचा वृत्तांत नुकताच प्रसिद्ध झाला आहे. फावल्या वेळांत लेखन करणारे सुखवस्तु लेखक सोडले तर लेखक-वर्ग बहुधा गरीब असतो आणि त्याला आपल्या मालकी हक्कांची पुरेशी जाणीव नसते, अितकेंच नव्हे तर अशा बाबतींत फिर्याद करण्याची शक्तिही फारशा लेखकांना नसते. ही जाणीव उत्पन्न करून संघशक्तीने मालकी हक्कांचें जतन करण्याचा या संस्थेचा उद्देश आहे. अशा रीतीने गेल्या वर्षांत कित्येक लेखकांना संस्थेने मोबदला मिळवून दिला आहे. मालकीहक्कांचा पद्धतशीर रीतीने भंग करणारे लोक म्हणजे बोलपटनिर्माते, नाटकमंडळ्या, विशेषतः हौशी मंडळ्या, आणि 'ऑल अिंडिया रेडिओ.' बोलपटनिर्माते लेखकांच्या गोष्टी चोरतात आणि

चोरी करूं नये म्हणून त्यांत फरक करून त्या बिघडवतात. हौशी मंडळ्या परवानगीशिवाय नाटकांचे प्रयोग करतात आणि 'ऑल अिंडिआ रेडिओ 'वर परवानगीशिवाय पद्यें म्हटलीं जातात. यांपैकी शेवटची संस्था सरकारी आहे, तेव्हां त्यांना लेखकांचे हक्क नाकबूल करतां येअीनात, म्हणून त्यांनी परवानगी मिळवण्याची जबाबदारी गायकांवर सोंपवली, पण हें कायदेशीर आहे असें वाटत नाही. वरील संस्थेने वरील सर्व बाबतींत खटपट करून बरेंच यश मिळवलें आहे. तथापि पुष्कळ वेळां लहानसहान ठिकाणीं केलेल्या नाट्यप्रयोगांची त्यांना बातमीही लागत नाही. या बाबतींत कोणींही त्यांना माहिती पुरवल्यास त्याकरतां थोडाबहुत मोबदला देण्याची संस्थेची तयारी आहे. यासंबंधी पत्रव्यवहार संस्थेचे चिटणीस श्री. राम गोगटे, सँढर्स्ट बिल्डिंग, सँढर्स्ट रोड, मुंबअी नं. ४, यांजकडे करावा.

त्याचप्रमाणें ही संस्था लेखकांच्या हिताचें रक्षण करण्याकरतां काढलेली आहे, ही व्यापारी संस्था नाही, हें लक्षांत घेऊन स्वतःच्या हिताच्या दृष्टीने लेखकांनी सभासद होऊन या संस्थेचा फायदा घ्यावा, हें वास्तविक लोकांना सांगण्याची जरूर नसावी. संस्थेची वार्षिक वर्गणी फक्त रु. ३ आहे.

---

## जनतेच्या माहितीसाठी

श्री. ना. स. बापट यांच्या 'मानवी जीवन व बुद्धिवाद ' या निबंधाच्या कांही प्रती प्रचारासाठी विनामूल्य वांटणें आहेत. महाराष्ट्रांतील व बृहन्महाराष्ट्रांतील सार्वजनिक संस्था, वाचनालयें, विद्यालयें, सामाजिक कार्यकर्ते वगैरेंपैकी ज्यांस ६ आणे खर्चून हें पुस्तक घेण्याचें सामर्थ्य नसेल, अशांस हें पुस्तक फक्त तीन पैशांचें तिकीट पाठवल्यास मोफत मिळेल. अितरांनी ट. ख. सह ६ आणे पाठवावे. खाजगी संस्था व सामाजिक दृष्टीने निष्क्रिय व्यक्ति यांस पुस्तक मोफत मिळणार नाही.

**संपादक, समाजस्वास्थ्य**

---